ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



गोष्ट क्र.२४

पुढच्या दहा वर्षांचं उद्दिष्ट असं म्हणताना दोन गोष्टी समोर ठेवाव्यात असं वाटतं. महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन आणि महिलांच्या समस्या हा विचार मला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवावासा वाटतो. रूप पालटू देशाचे यासाठी प्रत्येकानेच काम करणं गरजेचं आहे. आपण ज्या वातावरणात रहात आहोत, त्यात मला असं वाटतं की आपल्या देशावर आज खूप बौद्धिक आक्रमणं होत आहेत, आणि विविध देशद्रोही घटना घडत आहेत. प्रबोधिनीचे विद्यार्थी म्हणून आपण बौद्धिक क्षत्रिय व्हायला पाहिजे. विरोधकांना त्या शब्दात आणि त्या भाषेत उत्तरं देता आली पाहिजेत. समाज म्हणून आपला एक narrative असायला हवा. आपली जी विचारधारा आहे ती प्रखरतेने मांडता येणं हे महत्त्वाचं आहे. जसा आपण Intelligent Quotient (IQ) महत्त्वाचा आहे असं म्हणतो तसा Emotional Quotient (EQ) आणि Social Quotient (SQ) सुद्धा विकसित व्हायला हवा. हे तीन जर हातात हात घालून काम करायला लागले तरच आपल्या समाजाचं भलं होईल. पुढील काळात या विषयांवर बोलायला आणि इतरांना उद्युक्त करायला आवडेल.

भाग्यश्री साठये
(१९८७-१९९०)

**प्रबोधिनीतल्या आठवणी**

ज्ञान प्रबोधिनीचं माझ्या मनात केवळ शाळा किंवा संस्थेपेक्षा खूप मोठं स्थान आहे. मी ८वी ते १०वी अशी तीनच वर्षे प्रशालेत शिक्षणासाठी होते. शिक्षण असा जर विचार करायचा झाला तर पहिली गोष्ट आठवते, ती म्हणजे आम्हाला पाठ्यपुस्तकं नव्हती. आम्ही ग्रंथालयात जायचो, विश्वकोश (encylopedia) पहायचो, माहिती शोधायचो आणि त्यावर अभ्यास करायचो हे खूप वेगळेपण जाणवतं. विसूभाऊ संस्कृत शिकवायला होते, त्यांनी आम्हाला धातुरुपावली उलट आणि सुलट लिहायला सांगितली होती. पुढे संस्कृत मधे MA, B.Ed ही पदवी घेतली तेव्हा याचा काय फायदा होता ते कळत गेलं. आणखी एक आठवणारी गोष्ट म्हणजे प्रतिभा विकसन आणि परिस्थितीज्ञानाचे तास! त्याच्यामुळे पाठ्यपुस्तकातील शिक्षणापलिकडचं शिक्षण आम्ही पहायला शिकलो.

आम्हाला प्रकल्प असायचे. मी एका प्रकल्पा अंतर्गत पुण्याच्या उपमहापौरांची मुलाखत घेतली होती. गड-किल्यांच्या सहली केल्या होत्या, त्यामुळे गड-किल्ले कसे पहायचे, का पहायचे याच्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन मिळत गेला. दलावर जायचो तेव्हा आम्ही एकवर्षी पोहायला शिकलो. दल ही गोष्टही कधी विसरू शकत नाही. घट्ट झालेली मैत्री, वेगवेगळे खेळ, गीते याने गच्च भरलेले असे ते दिवस होते. गणेशोत्सव आणि बर्चीनृत्य हा इतका अविस्मरणीय अनुभव आहे की आजही जर गणेशोत्सवाच्या विसर्जनाच्या दिवशी मी पुण्यात असले तर आवर्जून मिरवणुकीत सहभागी होते. तंबूशिबिर ही आणखी एक आठवणीतली गोष्ट! आम्ही संपूर्ण गावातले हातपंप (handpump) किती, विहिरी किती हे त्यावेळी मोजलं होतं.

**विद्याव्रत अनुभवताना ...**

विद्याव्रत संस्कार हा असाच एक संस्कार. २५ वर्षांपर्यंत विद्याभ्यासाची प्रतिज्ञा घेणं, व्रतचिन्ह धारण करणं, त्याच्यातून आपली जडण-घडण होणं या सगळ्या दृष्टिकोनातून आपण त्याच्याकडे बघतो. पण मुलीची मुंज होणं हे आपल्या समाजात दुर्मिळ आहे. जेव्हा माझे वडील निवर्तले, तेव्हा माझ्या मोठ्या बहिणीने विचारलं होतं, की तू अंत्यसंस्कार करशील ना? तुझी मुंज झालेली आहे. हे जेव्हा ऐकलं तेव्हा आपला समाज याकडे कुठल्या दृष्टीने बघतो याची जाणीव झाली. गळ्यात धारण केलेलं व्रतचिन्ह बघितल्यावर, त्या संस्कारांची, उपासनेची जाणीव कायम होत रहाते. आम्हाला शाळेत गिरीशराव भूमिती शिकवायला यायचे आणि ते फळ्यावर दोन्ही हाताने लिहायचे हे आजही आठवतं.

पुढे ११वी ते BA पर्यंत मी फर्ग्युसन महविद्यालयात होते. संस्कृत हा मुख्य विषय होता. आम्हाला शिकवायला अतिशय विद्वान असे धडफळे सर होते. तेव्हा आम्ही संस्कृत इंग्रजीतून शिकायचो. महाविद्यालयात २६ जानेवारीची जी प्रात्यक्षिकं असतात त्यात आम्ही जाळाचं लेझीम केलं होतं. प्रबोधिनीत कबड्डी खेळायचो. पण महाविद्यालयात गेल्यावर मी कबड्डी संघाची कप्तान होते. अनेक वर्षांनी महाविद्यालयात कबड्डीचा मुलींचा संघ नव्याने सुरू केला होता. एक वर्ष कॉलेजची general secretary होते, आणि एक वर्ष महिला प्रतिनिधी होते. तेव्हा Insynch ( Intercollegiate synchronization) नावाचा एक खूप मोठा, जवळपास ५० कॉलेज एकत्र यायची, असा पाच दिवसांचा कार्यक्रम असायचा, आमच्यावर त्याची प्रमुख जबाबदारी होती. त्याचं नियोजन आणि कार्यवाही हा एक खूप सुंदर अनुभव होता. या महाविद्यालयीन काळात वैशाली हॉटेल हा ही एक अविभाज्य भाग! B.Ed ला असताना आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार मिळाला होता. घरी फोन केल्यावर बाबा म्हणाले होते, पुन्हा एकदा बघ तुझेच नाव आहे ना! पण तेव्हा असं वाटलं की लहानपणापासून जे शाखेने, शाळेने संस्कार केले त्याच्यामुळे हा पुरस्कार मिळाला!

**शाखा ते प्रचारिका**




राष्ट्र सेविका समिती याची स्थापना १९३६ साली झाली. लक्ष्मीबाई केळकर यांनी या समितीची स्थापना केली. जशा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा चालतात तशाच समितीच्या मुलींच्या व महिलांच्या शाखा चालतात. भारतभरात एकूण २९१० शाखा चालतात. जवळपास १००० सेवा कार्य चालतात. या माध्यमातून गेली ८४ वर्षं महिला समाजासाठी काम करत आहेत.

मी अगदी पहिलीत असल्यापासून शाखेत जात होते. माझ्या दोघी मोठ्या बहिणींनीही प्रचारिका म्हणून काम केलं आहे. वडील संघाचे स्वयंसेवक होते, आई सेविका होती. त्यामुळे कुटुंबात संघाचं वातावरण होतं. राष्ट्र सेविका समितीचे चार वर्ग असतात. प्रारंभिक - प्रवेश - प्रबोध व प्रवीण. प्रबोध वर्ग २१ दिवसांचा होता.



आम्ही चौघी बहिणी



माझे आई–बाबा

त्या २१ दिवसांच्या वर्गाच्या वातावरणात भारावून गेल्यासारखं होतं. त्यात शेवटी तुम्हाला काय आवडलं आणि पुढे तुम्ही काय करणार असं सांगायचं असतं. तेव्हा मी पाच वर्षं समितीचं पूर्णवेळ काम करेन असा संकल्प केला. जसं–जसं आपण काम करत जातो, तशी–तशी ती झिंग चढत जाते, की अजून काम केलं पाहिजे, अजून काम केलं पाहिजे. आणि मग शाखेचे दोन तास पुरेनासे होतात. मग सहा तास –आठ तास असं करत–करत पूर्णवेळ काम करण्याची मानसिकता तयार होते. १९९८ साली मी प्रचारिका म्हणून कामाला सुरुवात केली. प्रचारिका म्हणजे अविवाहित राहून, स्वतःचे घर सोडून समिती सांगेल तिथे राहून, संघटना सांगेल ते काम निरपेक्ष, निस्वार्थी भावनेने करणे.

दोघी मोठ्या बहिणींनी प्रचारिका म्हणून काही काळ काम केलं होतं. त्यानुसार पहिल्यांदा परवानगी मिळवणं फार काही अवघड नव्हतं. पण पूर्णवेळ काम करण्याच्या जबाबदारीत निश्चितच अडचणी येत होत्या. काही काळ, चार–पाच वर्षं बाबा माझ्याशी बोलायचे नाहीत. पण दुसऱ्या बाजूला ते माझ्यासाठी एखादा लेख, एखादं पद्य, पुस्तक असं काढून ठेवायचे. म्हणजे एका बाजूला वडिलांचं मन आणि दुसऱ्या बाजूला स्वयंसेवकाचं मन अशा दोन्ही बाजूने ते विचार करायचे. मग काही वर्षांनंतर आईच्या आग्रहाने परवानगी दिली. असे प्रसंग निश्चित येतात. त्यावेळेला आपला निर्णय बरोबर आहे का असा प्रश्न पडायला लागतो.

पण वाईट अनुभवापाठोपाठ एखादा चांगला अनुभवही येतोच. महिला म्हणून काम करण्याचे ही वेगळे अनुभव, वेगळी बंधनं येतात. सुरक्षेच्या दृष्टीने थोडी जास्त काळजी घेऊन कुठलंही काम करायला लागतं. एक गीत आठवतं आहे ते म्हणजे 'मन मस्त फकिरी धारी है, अब एक ही धुन जय जय भारत'. अशा मस्तीत आपण काम करत जातो.

## शारीरिक सक्षमता आणि विक्रम

माझ्याकडे खूप वर्षं शारीरिक प्रमुख म्हणून जबाबदारी होती. शारीरिक प्रमुख म्हणजे समितीत येणाऱ्या महिला किंवा मुलींसाठी योग, ज्युडो–कराटे, लाठी, अनेक खेळ इत्यादीच्या प्रशिक्षणाची जबाबदारी. आधी प्रांताची आणि मग महाराष्ट्र – गोवा अशा संपूर्ण क्षेत्राची. शारीरिक प्रमुख असल्यामुळे स्वभाव कडक शिस्तीचा झालेला होता. त्याच्यानंतर मी अखिल भारतीय तरुणी प्रमुख म्हणून काम केलं, ज्यात मला १६ ते ३० या वयोगटातल्या युवतींबरोबर काम करण्याची संधी मिळत गेली. मग त्या कडक शिस्तीला थोडी मुरड घालावी लागली. आता मी महिला समन्वयाचे काम करते, तेव्हा माझ्यातला जो कठोरपणा होता तो मी अजून कमी करण्याचा प्रयत्न करते. मला वाचनाची फार गोडी नव्हती. हळूहळू काम करताना वाचनाचीही सवय आता झाली आहे.

२००९ साली आम्ही वंदनीय ताई आपटे म्हणजेच समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सलग १०० तास सूर्यनमस्कार घालण्याचा उपक्रम अखंड सूर्यनमस्कार यज्ञ आयोजित केला होता. त्यांचे जन्मगाव आंजर्लेपासून पहिला तास सुरू करून शेवट पुण्यात केला होता. सलग १०० तास म्हणजे एका गावात एक तास असे क्रमाक्रमाने १०० गावात १०० तास असा संपूर्ण उपक्रम केला होता. सलग १०० तास म्हणताना यातील काही गावात मध्यरात्री किंवा पहाटेच्या वेळीही सूर्यनमस्कार घातले गेले. आमच्या या उपक्रमात १५०७७ जणी सहभागी झाल्या होत्या. ३ वर्षांपासून ते ९० वर्षांच्या आजींपर्यंत सर्व वयोगटातल्या मुली व महिला होत्या. एकूण सूर्यनमस्कारांचा आकडा हा ३,६७,८२४ इतका झाला होता. या उपक्रमाची Limca book of records मध्ये नोंद झाली आहे.



## करोना सर्वेक्षण


स्वदेश

कोरोना चुनौती का डटकर सामना करेंगे : चंदा ताई

आम्ही मागच्या हनुमान जयंतीला तरुणी विभागातर्फे सूर्यनमस्कार यज्ञाचा देशव्यापी उपक्रम केला होता. आत्ता COVID काळात एका महिलेने सांगितले, की झोपडपट्टीतल्या लोकांची अशी परिस्थिती आहे की सार्वजनिक शौचालायात जाण्यासाठी जे पाच रुपये लागतात, तेवढेही त्यांच्याकडे नाहीत. हे वाक्य जेव्हा मी बैठकीत ऐकलं ते मनाला खूप लागलं. आज आपण जर महिला संघटनेचे काम करतो आहोत तर आपण त्यांच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे असं प्रकर्षाने जाणवलं आणि सर्वेक्षणाची कल्पना सुचली. मग आम्ही १२०० तरुणींच्या माध्यमातून देशभरातील १७००० महिलांचे सर्वेक्षण केलं. त्यामध्ये समस्या, समाधान आणि सुझाव असे तीन मुद्दे आम्ही ग्राह्य धरले होते. फोनवरून किंवा अनौपचारिक गप्पांमधून संवाद साधला व त्या माहितीचं संकलन केलं. याचे वैज्ञानिक विश्लेषण करून त्यातील निष्कर्ष व अनुभव यावर आधारित १२ जानेवारी रोजी पुस्तक प्रकाशित केलं. हा सगळा अहवाल महिला व बालविकास मंत्रालयाच्या स्मृतिजी इराणी यांना भेटून दिला. अशा काही ना काही कल्पना सुचत असतात पण सगळ्यांच्या सहकार्यानेच कार्य संपूर्ण होतं.

## उत्तमता आणि प्रेरणा

शाळेत ढोल-ताशा ही वाद्यं आम्ही शिकलोच होतो. पण समितीत घोषवादन ही एक कला शिकायला मिळाली. त्यात आनक (side drum), पणव, शंख, बासरी, त्रिभुज आणि झल्लरी अशी काही वाद्यं ही वाजवायला शिकले. ज्या परदेशी शाखा चालतात, त्यांचे दर पाच वर्षांनी भारतात एक शिबिर होतं. त्या शिबिराच्या समारोपात आम्हाला घोषाचे प्रात्यक्षिक करायचं होतं. ४० देश आणि १०,००० लोक यांच्यासमोर ते प्रात्यक्षिक करायचं असल्यामुळे त्याची गुणवत्ता ही तशीच असायला हवी होती. त्या पाच मिनिटाच्या प्रात्यक्षिकाचा आम्ही दोन-तीन महिने कसून सराव केला होता आणि शेवटच्या तीन दिवसात संपूर्ण प्रात्यक्षिकाचा २१ वेळा सराव केला होता. परिपूर्णता आणि उत्तमता याचा प्रत्यय तेव्हा आला.



या २२ वर्षांच्या प्रवासात एकही दिवस असा गेला नाही की ज्या दिवशी काही प्रेरणा मिळाली नाही. चार गोष्टी सतत या संघटनेच्या कामात होत असतात. त्या म्हणजे शाखा, बैठक, कार्यक्रम व भेटीगाठी किंवा संपर्क. या प्रत्येकातून नवीन काहीतरी रोज घडतच असतं. आणि त्यामुळे प्रेरणा सतत मिळतच असते. संपर्क हा तर संघटनेच्या कामातला इतका अविभाज्य भाग आहे, की त्यातून अनेक लोकांचं प्रेम मिळत राहतं. परवाच यवतमाळच्या एका मावशींचा फोन आला होता. त्यांना मी विमानतळावर कुठेतरी धावत पळत चालले आहे असं स्वप्न पडलं होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी फोन लावून त्यांनी माझी काळजीपूर्वक विचारपूस केली. त्यांचा हा संवाद मला खूप ऊर्जा देऊन गेला. या संघटनेमुळे आणि लोकबांधणीमुळे मिळणारं प्रेम आणि आपुलकी इतकी भरभरून आहे की त्यातूनच सतत काम करण्याची नवी ऊर्जा मिळत असते. आपल्यापेक्षा जास्त समर्पक वृत्तीने काम करणारी माणसं मी रोज पाहते. अनेक कार्यकर्ते असे आहेत की ज्यांना बोलता येत नाही, अंथरुणावर खिळलेली प्रकृती, पण तरीही आजची प्रार्थना झालीच पाहिजे. असे निष्ठावान स्वयंसेवक आणि सेविकांना पाहतो आणि त्यातूनच प्रेरणा मिळते.




## वक्ता दशसहस्रेशु

या २२ वर्षांच्या काळात अनेकवेळा भाषण करण्याची वेळ आली. या सगळ्या भाषणांची टिपणं मी जपून ठेवलेली आहेत . त्यात २४ मुख्य विषय आणि २५० पेक्षा जास्त उपविषय आहेत, ज्यावर मला बोलण्याची संधी मिळाली. एकदा मी काही कौटुंबिक कारणांसाठी थायलंडला गेले होते. मोदी सरकारला दोन वर्षं पूर्ण झाली म्हणून तिथे कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमात बोलण्यासाठी अचानक तिथल्या प्रचारकांचा फोन आला. तर अशी ऐनवेळी अभ्यास करून, आणि कुठल्याही विषयावर बोलायची आपली तयारी पाहिजे हे तेव्हा लक्षात आलं. असेच यावर्षी युवा दिनाला, NAAC संस्थेने

'स्वामी विवेकानंदांचे शिक्षणविषयक विचार हे आत्मनिर्भर भारताला कसे पूरक आहेत', या विषयावर व्याख्यानासाठी बोलावलं होतं. एवढ्या मोठ्या संस्थेमध्ये असा विषय मांडणं हा खूप मोठा अनुभव होता. संघ आणि त्याच्या प्रेरणेनी एकूण ३५ पेक्षा जास्त संघटना देशात कार्यरत आहेत. यात क्रीडा, कला, कृषी, विज्ञान इत्यादि विविध क्षेत्रांतील लोकांमध्ये देशभक्ती रुजवणे आणि संस्कार करणे, समाजसेवेची प्रेरणा देणे अशा स्वरूपाचं काम चालू असतं. या विविध संघटनांमधे भाषण करायला बोलावलं जातं. त्यामुळे विविध भाषेत विषय मांडणी व अनेक विषयांचा अभ्यास होतो.

लेखनाबद्दल सांगायचं तर दोन पुस्तकं लिहिली आणि २४-२५ विषयांवर लेखही लिहिले. पहिलं पुस्तक आहे वर्गसंहिता. समितीची जी शिबिरं, वर्ग होतात त्यातल्या व्यवस्था आणि त्यातील शिक्षिका व मार्गदर्शिकांसाठी हे पहिलं पुस्तक आहे. दुसरं पुस्तक 'कर्मयोगी' हे मी माझ्या वडिलांवर लिहिलं आहे. त्यांनी खूप सामाजिक उपक्रम केले होते. उदाहरणार्थ त्यावेळी नोटा staple केल्या जायच्या आणि त्यामुळे काढताना फाटायच्या. तेव्हा त्यांनी RBI ला पत्र लिहिलं. त्याचा त्यांनी खूप पाठपुरावा केला आणि शेवटी RBI ने ही पद्धत बंद केली व त्यांचे बाबांना पत्र आले. दुसरे उदाहरण म्हणजे दत्तवाडी चौकात खूप वाहतूक कोंडी व्हायची. बाबांनी वाहतूक खात्याला खूप सांगून पाहिलं, पण काहीच झालं नाही. शेवटी बाबा स्वतः संघाच्या गणवेशात, शिट्टी घेऊन उभे राहिले आणि वाहतूक कोंडी सोडवली. पुढे बाबांच्या प्रयत्नांनी तिथे सिग्नल बसवला. असं समाजातल्या प्रत्येक समस्येवर आपणहून पुढाकार घ्यायचा त्यांचा आग्रह होता. या पुस्तकाच्या लिखाणाने मलाच मी करत असलेल्या कामामध्ये खूप प्रेरणा मिळाली.

**आपत्ती आणि संघर्ष**

या कार्यकाळात अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती येत होत्या. २००५ साली माझं मुख्यालय ठाणे येथे होतं. तेथून अगदी २० मिनिटांच्या अंतरावरची एक संपूर्ण वस्ती त्यावर्षीच्या पुरामुळे बुडालेली होती. त्या ठिकाणी सलग आठ दिवस आम्ही मदत करत होतो. ते दृश्य पाहणंसुद्धा खूप विदारक होतं! कालपर्यंत दिसणारी घरं आज अचानक गायब झालेली होती! त्या वस्तीत आवश्यक गोष्टी जसे कपडे, खाद्यपदार्थ, मेणबत्ती-काडेपेटी अशा वस्तू आम्ही त्यांना पुरवत होतो. त्याच वस्तीत पुढे १५ ऑगस्टच्या दिवशी पूजा होती. आणि त्यांनी मला आवर्जून पूजेला येण्याचं आमंत्रण दिलं. 'आप इस पूजा के लिये जरूर आईयेगा' हा फोन जेव्हा मला आला तेव्हा मी अगदी कृतकृत्य झाले. आपण निरपेक्ष आणि निस्वार्थ रीतीने सेवा करतो पण लोकांना त्याची नक्कीच जाणीव असते.

असंच आम्ही, तामिळनाडू येथे जेव्हा त्सुनामीचं संकट आलं होतं तेव्हा मदतकार्य करण्यासाठी गेलो होतो. तिथल्या माणसांच्या मनात त्या समुद्राच्या प्रचंड लाटा पाहून इतकी भीती बसली होती की नळाला पाणी आलं एवढं जरी उच्चारलं तरी लोकं सैरावैरा पळत सुटायची. पाण्याच्या बाटलीमधलं पाणी बघायलासुद्धा भीती वाटायची अशी परिस्थिती होती. या परिस्थितीत आम्ही लोकांना धीर दिला. एका सेविकेला तीन मुली समुद्रात आत्महत्या करायला चालल्या आहेत असं दिसलं. त्या मुलींचे असे म्हणणे होते, की जर आम्ही आत्महत्या केली तर आमच्या कुटुंबाला प्रत्येकी एक लाख रुपये मिळतील आणि आमचा परिवार शांततेने जगू शकेल. हे ऐकून अक्षरश: अंगावर काटा आला. पुढे त्यांची तेथील सेविकांनी समजूत काढली आणि त्यांना जगण्याचं बळ दिलं.

त्यानंतर आलेली मानवनिर्मित आपत्ती म्हणजे मुंबईमध्ये झालेला २६/११ चा हल्ला. दोन दिवसांनी आम्ही तिथे गेलो. जिथे गोळीबार झाला त्या ठिकाणी गेलो. जिथे अतिरेकी रहात होते तिथल्या एका किराणा मालाच्या दुकानदाराला आम्ही विचारलं, की काय रे तुला याबद्दल काही माहित होतं का? आपल्या परिसरात बाहेरचे, अनोळखी लोक येतात, शस्त्रास्त्र घेऊन येतात, बरेच दिवस राहतात आणि आपल्याला पत्ताही लागत नाही. या प्रसंगाने मनात जागरुकता निर्माण केली. त्यावेळी एका दवाखान्यातल्या जखमी लोकांना भेटायला गेलो. तिथे बाहेर जखमी आणि मृतांच्या याद्या लावल्या होत्या. तो फलक वाचणं हासुद्धा अगदी भयानक अनुभव होता. त्यामुळे आरोग्य कर्मचारी हे कुठल्या अवस्थेत, मानसिकतेत काम करतात याची नव्याने जाणीव झाली. त्यांचे आम्ही मनापासून आभार मानले.

जम्मू-काश्मीरमध्ये २००८ साली अमरनाथ आंदोलन झालं होतं. अमरनाथ यात्रेच्या रस्त्याचा काही भाग त्या वर्षी सरकारने बंद केला होता. त्यामुळे सगळे हिंदू लोक चिडले आणि आंदोलनाला सुरुवात झाली. ६२ दिवस हे आंदोलन चालू होतं. शाळा, कॉलेज, ऑफिस, वाहतूक या सगळ्या गोष्टी ६२ दिवस बंद होत्या. आम्ही ज्या दिवशी जम्मूला पोचलो तेव्हा आंदोलनाने इतकं विक्राळ रूप धारण केलं होतं की सरकारला नमावं लागलं. यात मुख्य तीन दिवस आंदोलन झाले. त्यात एक दिवस अडीच लाख महिला रस्त्यावर उतरल्या होत्या. एक दिवस छोट्या मुलांनी पण आंदोलन केले. एवढे मोठे आंदोलन पाहून शेवटी सरकारने तो रस्ता मोकळा केलात्यामुळे आंदोलनाचे रूपांतर विजययात्रेत झाले. या विजययात्रेसाठी ठिकठिकाणहून

हजारो लोक येऊन शामिल होत होती. एका चौकात आम्ही सगळे आलो आणि आम्हाला काही कळायच्या आत, चारही बाजूंनी अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. नुसता धूर आणि आमच्या डोळ्यातून घळाघळा पाणी! असा हा अनुभव फक्त टीव्हीवर पाहिला होता, पण त्यादिवशी हे प्रत्यक्ष अनुभवायला मिळालं. त्या वेळेला तिथल्या एका कार्यकर्तीने आमचे हात धरले आणि आम्हाला त्या गर्दीतून बाहेर घेऊन गेल्या आणि म्हणाल्या, ''इन दोनोंको कुछ होना नही चाहिये, ये महाराष्ट्र से आई है''. त्यांची भावना अशी होती, की त्यांचा जीव गेला तरी चालेल पण आम्हाला काही होता कामा नये. ही जी जोडली गेलेली मनं आहेत त्यालाच राष्ट्रीय एकात्मता म्हणतात! विजययात्रेला विरोध झाला तरी त्या मैदानात २०० लोकं आधीच पोचली आणि त्यांनी विजयोत्सव साजरा केला! दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये बातमी आली की लोगो ने मनाई दिवाली होली और बैसाखी एकसाथ! लोकं अक्षरशः रस्त्यावर येऊन आनंदाने नाचले होते, रंग खेळले, रोषणाई करण्यात आली! त्यादिवशी जेव्हा शाखेत खेळताना भारत माता की जय अशी घोषणा दिली, तेव्हा त्याचा खरा अर्थ कळाला!

**केल्याने देशाटन**

समितीच्या कामानिमित्त मी वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करते. अशीच विदर्भातल्या प्रवासाची एक आठवण आहे. मी पहाटे ३.३० वाजता एका घरी पोचले. त्यांनी मला गरम चहा दिला आणि पहाटे पावणे चार वाजता निघताना माझी ओटी भरली! हा अनुभव इतका अविस्मरणीय होता की भारतीय संस्कृती म्हणजे काय आहे, अतिथी देवो भव हा संस्कार किती खोलवर रुजला आहेत, याची प्रचीती आली!



मी १९९८ साली राजस्थानमध्ये काम करायला गेले. आपल्याकडच्या आणि तिथल्या सामाजिक वातावरणात किती फरक आहे हे मला खूप जाणवलं. जयपूर मधील एका घरात नियमित शाखा लागायची. तिथल्या एका सेविकेला मी विचारलं की सासऱ्यांकडून शाखेचे काही खेळ का नाही शिकून घेत? सासऱ्यांकडून खेळ शिकून घे असं म्हटल्याबरोबर तिने तिचा डोक्यावरचा घुंघट पूर्ण चेहेऱ्यावर ओढला आणि स्वयंपाकघराकडे धूम ठोकली. तिच्या पाठोपाठ जाऊन मी तिला कारण विचारलं. तेव्हा ती म्हणाली की मी माझ्या सासऱ्यांसमोर साधी उभीसुद्धा राहू शकत नाही, मी खेळ कसे शिकू? तेव्हा मला अचानक झटका बसला की आपण राजस्थानात आहोत. आपल्या गावी नव्हे. इथल्या माणसांच्या चाली-रीती, परंपरा यात फरक असणार आहे. असे वेगवेगळे अनुभव येतात. त्या प्रांतानुसार वेशभूषा बदलाव्या लागतात, त्यांच्या छोट्या-छोट्या पद्धती आत्मसात करून घ्याव्या लागतात. त्या भाषेतले काही शब्द शिकून घ्यावे लागतात, Be a Roman when you are in Rome या उक्तीप्रमाणे काम करत रहावं लागतं.

**इंग्लंड मधील प्रवास**

मी जेव्हा कामानिमित्त वेगवेगळ्या देशांमध्ये जाते तेव्हा मला वैविध्यपूर्ण अनुभव येतात. मी जेव्हा इंग्लंडला गेले होते, तेव्हा तेथील संसद भवनात दरवर्षी दिवाळी साजरी केली जाते असं मला कळलं. २०११ साली एका स्वयंसेवकाच्याच पुढाकाराने तिथे दिवाळी साजरी करायला सुरुवात झाली होती. मी त्या दिवाळीच्या कार्यक्रमाला संसदेत गेले असता, तिथल्या एका महिलेनी मला दरवाजात कुंकू लावलं, आणि हातावर मिठाई ठेवली. House of commons च्या सभागृहात राम-सीता-लक्ष्मण यांची मूर्ती ठेवली होती, अन्नकोट मांडला होता. रामायणावर आधारित भरतनाट्यम् केलं व काही मंत्र्यांची भाषणे झाली. याचं मला खूप कौतुक वाटलं. ज्या देशाने आपल्यावर इतके वर्षं राज्य केलं त्या देशात आज आपला सण असा



साजरा केला जातो याचा खूप अभिमान वाटला. आणखी एक आलेला अनुभव म्हणजे आयरलंडला भगिनी निवेदितांच्या जन्मस्थानाला भेट!. त्यांच्या जन्मस्थानी एक मोठी पाटी लावण्यात आली आहे. त्यावर लिहीले आहे...Margaret Elizabeth Noble (Sister Nivedita), Writer and Indian Nationalist born in this street! एकदा त्या रस्त्यावरून एक आयरिश महिला चालल्या होत्या आणि त्यांना Indian Nationalist असं कस लिहिलंय याबद्दल खूप आश्चर्य वाटलं. म्हणून त्यांनी भगिनी निवेदितांवर संशोधन करायला सुरुवात केली. भगिनी निवेदितांचे जीवन त्यांना इतकं भावलं, की आणखी चार लोकांना बरोबर घेऊन या आयरिश महिलेने (जीन मैकेनीस) सव्वा तासाचं नाटक बसवलं. आयरलंडच्या राष्ट्रपतींना भेटून आयरिश अभ्यासक्रमात भगिनी निवेदितांचं चरित्र असावं आणि त्यांच्या नावाचं पोस्टल तिकीट काढावं हा प्रस्ताव त्यांनी मांडला. तिथल्या एका वृत्तपत्राने खूप मोठं सर्वेक्षण केलं होतं. आयरलंडमधली सर्वात प्रभावी व्यक्ती कोण, तेव्हा आयरिश नागरिकांनी त्याचं उत्तर भगिनी निवेदिता असं दिल. आयरलंडमध्ये भगिनी निवेदितांचं असं विशेष स्थान आहे.



**इंडिया हाऊस इंग्लंडमध्ये प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी श्री. राहुल नांगरे यांची भेट**

परदेशात गेल्यावर कधी-कधी भाषेच्या उच्चारांची अडचण येते, अनेकदा असं का? तसं का? असे अनेक प्रश्न विचारले जातात. त्यांची उत्तरं द्यावी लागतात, पण मग सरावाने त्या अडचणी दूर होतात. परदेशी लोकांकडून स्वच्छता आणि शिस्त या गोष्टी खरोखर शिकण्यासारख्या आहेत. वेळेचं पालन आणि उद्दिष्ट केंद्रित ( target orietned) व नियोजनबद्ध काम ती माणसं करतात. documentation किंवा अभिलेखागार याबद्दलही खूप कौतुक वाटतं.

आप्पांच्या जन्मशताब्दी वर्षात प्रबोधिनीत काही काम करण्याची खूप इच्छा होती. त्यानिमित्ताने मी १०० तास तरी काम करेन असं ठरवून गिरीशरावांना सांगितलं. तेव्हा महेंद्रभाई यांनी मला नेतृत्वाच्या पैलूंवर एक टिपण लिहायला सांगितलं होतं. त्या लिखाणामुळे एक वेगळा दृष्टीकोन मला मिळाला.

## नारी शक्ती कुंभ

समितीमध्ये मातृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व असे तीन महत्त्वाचे गुण सांगितले जातात. शाखेच्या गट नायिकेपासून ते समितठ्या अखिल भारतीय प्रमुखापर्यंत हे नेतृत्वगुण हळूहळू विकसित होत जातात. जबाबदाऱ्या दिल्या जातात आणि नकळत त्यातून नेता घडत जातो. २०१८ साली भारतात एक 'नारी शक्ती कुंभ' असा कार्यक्रम झाला होता. देशातल्या विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ४५०० महिला एकत्र आल्या होत्या. अगदी निर्मला सीतारामन् ते विविध राज्यांचे राज्यपाल, मंत्री अशा अनेकजणी होत्या. त्या कार्यक्रमाची संचालन समिती प्रमुख म्हणून माझ्याकडे जबाबदारी होती. हा कार्यक्रम जेव्हा अतिशय उत्तम पार पडला, सर्वांची शाबासकी मिळाली तेव्हा असं लक्षात आलं, की हे लहानपणापासून शाखेत, वर्गात घडत जाणारे संस्कार याचंच फलित होतं.



**नारी शक्ती कुंभ, वृंदावन मध्ये गोवा राज्यपाल मा. मृदुलाजी सिन्हा यांचे स्वागत करताना**



**मा. सुमित्राताई महाजन यांच्याबरोबर**







**वंदनीय प्रमुख संचालिका मा. शांताक्का यांच्याबरोबर**

आजच्या काळात खंबीर अशा सामाजिक नेतृत्वाची खूप गरज आहे तरच आपण आपल्या देशाचा विकास घडवून आणू शकू असं मला वाटतं. आपण ज्या परिसरात राहतो, तिथे आपण काय चांगला उपक्रम घडवून आणू शकतो? यासाठी पुढाकार घेणं हेच नेतृत्व आहे. पुढे होऊन काम करणं याची गरज वाटते. नेता कसा असावा? तर लोकांना बरोबर घेऊन जाणारा असावा, नेता हा अनुयायांपेक्षा एकच पाऊल पुढे असायला हवा. नेता हा मार्गदर्शक असला पाहिजे. व त्या मार्गावरून जाताना काम करवून घेऊन, प्रेरणा देऊन जो पुढे जातो तो नेता. बदल घडवून आणणारा व सर्वांची काळजी घेणारा असा तो नेता. सोप्या शब्दात सांगायचं झालं तर सर्वांचे जेवण झाल्यावर शेवटी जेवणारा तो नेता. संपूर्ण गटाला यशाचं श्रेय देणारा आणि अपयश आलं तर आपल्याही निर्णयात काही खोट होती हे पुढे होऊन मान्य करणारा तो नेता. जसं कुंभार मडक्यावरून जोरात थापट्या मारतो पण आतून अलगद हात फिरवतो, तसाच चोख कामासाठी आग्रही पण प्रेमळ असतो तो नेता.

**स्त्री – एक चिंतन**




एखाद्या विशिष्ट विचारधारेच्या समूहाबरोबर काम करायला सुरुवात केली की टीका ही होतेच. आणि त्यातून जर ते काम सामाजिक असेल तर नक्कीच होणार. टीका ही कायम तीन स्तरावर होते. एक वैयक्तिक पातळीवर, एक संघटना पातळीवर आणि एक देशपातळीवर. जेव्हा मी २०११ साली UK च्या प्रवासाला गेले होते, तेव्हा भारतात नुकतच निर्भया प्रकरण झालं होतं. तेव्हा तिथल्या काही जणींनी असं विचारलं, की तुमच्याकडे रस्त्यावर असे अत्याचार होतच असतात का? हा प्रश्न पचवायला मला खूप जड गेलं. आपल्या देशाबद्दल कोणी तरी असं बोलतंय हा विचारच खूप त्रासदायक असतो. पण मग त्यातूनही बोध घेऊन काही जागृती करायला हवी, समाज प्रबोधन करणं अशा रीतीने ती ऊर्जा परिवर्तित व्हायला हवी. जेव्हा टीका होते तेव्हा आपल्याला खूप काही शिकायला मिळतं. सुरुवातीला मनाची चल-बिचल होते, राग येतो पण एका पातळीनंतर हे सगळं थांबतं, टीकेची सवय व्हायला लागते. आणखी एक म्हणजे आक्षेपांना उत्तर देता-देता नवा अभ्यास होत जातो, अधिकाऱ्यांशी चर्चा होते, चिंतन होते आणि शिकायला मिळते.



मला असं वाटतं की हिंदू धर्मात स्त्रीबद्दल जितका विचार केला आहे तेवढा अन्यत्र कुठेही केलेला दिसत नाही. आपल्या महिला अगदी ऋषिका, सम्राज्ञी ते देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधानही झाल्या आहेत. सशक्तीकरणाची व्याप्ती नक्कीच वाढलेली आहे. आज आपल्या देशात संधी वाढल्या आहेत. आम्ही समितीची प्रार्थना जेव्हा म्हणतो, त्यातली एक ओळ आहे, सुशीलाः, सुधीराः, समर्थाः, समेताः. महिलांनी कसं असावं याचं उत्तर यात मिळतं. जर अशा सुशील, सुधीर, समर्थ महिला संघटित झाल्या तर पुढे संपूर्ण हिंदू राष्ट्राची पुनर्निर्मिती होईल असे समितीची प्रार्थना सांगते. त्याच्यासाठी आम्ही भावी तेजस्वी राष्ट्राच्या जननी होऊ. जननी ही फक्त शारीरिक संकल्पना नसून मानसिक संकल्पना आहे. आम्ही काहीतरी श्रेष्ठ निर्माण करणाऱ्या होऊ हा संकल्प आपण करायला हवा. स्त्री ही कायम स्वसंरक्षणक्षम असायला हवी. आता स्व म्हणजे नक्की काय तर स्वत्त्वाचं रक्षण, स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म आणि स्वसंस्कृती याच्या रक्षणासाठी तिने काम करायला हवं. ही स्त्री सशक्तीकरणाची संकल्पना आहे.

आजच्या काळात महिला सशक्तीकारण म्हटल्यावर त्याची आर्थिक बाजू जास्त विचारात घेतली जाते. पण ती सर्वार्थाने सक्षम व्हायला हवी, तिच्या विचारांची प्रगल्भता विकसित करायला हवी. आज इतके अत्याचार, बलात्कार पाहता त्यावर जर ठोस उपाय शोधायचा असेल तर स्त्री सामर्थ्यवान व्हायला हवी. सर्व स्त्रियांना स्वसंरक्षण आलंच पाहिजे. दुसरं म्हणजे महिलांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टीकोन बदलायला हवा. वंदनीय मावशी म्हणायच्या, स्त्रीला देवताही बनवायला नको आणि दासीही नको. स्त्रीचे समाजाचा अर्धा भाग म्हणून देशासाठी योगदान हवे.

सध्या माझी मुख्य जबाबदारी महिला समन्वयाची आहे. म्हणजे संघ आणि त्याच्याशी निगडीत ज्या ३५ संघटना आहेत त्यातल्या सगळ्या महिलांसाठी हा मंच आहे. महिलांविषयक अध्ययन, चिंतन, समस्या परिहार, प्रशिक्षण आणि कृतियोजना असं काम आम्ही करतो. एकूण सामाजिक कामात महिलांचा जितका सहभाग अपेक्षित आहे तितका अजून मिळत नाही. त्यासाठी महिला पुढे यायला हव्यात. यावर आणखी काम करण्याची नक्कीच गरज आहे.

पुढच्या दहा  वर्षांचं उद्दिष्ट असं म्हणताना दोन गोष्टी समोर ठेवाव्या असं वाटतं. महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन आणि महिलांच्या समस्या हा विचार मला जास्तीत जास्त लोकांबद्दल पोचवावासा वाटतो. रूप पालटू देशाचे यासाठी प्रत्येकानेच काम करणं गरजेचं आहे. आपण ज्या वातावरणात रहात आहोत, त्यात मला असं वाटतं की आपल्या देशावर आज खूप बौद्धिक आक्रमणं होत आहेत, आणि विविध देशद्रोही घटना घडत आहेत. प्रबोधिनीचे विद्यार्थी म्हणून आपण बौद्धिक क्षत्रिय व्हायला पाहिजे. विरोधकांना त्या शब्दात आणि त्या भाषेत उत्तरं देता आली पाहिजेत. समाज म्हणून आपला एक narrative असायला हवा. आपली जी विचारधारा आहे ती प्रखरतेने मांडता येणं हे महत्त्वाचं आहे. जसा आपण Intelligent quotient (IQ) महत्त्वाचा आहे असं  म्हणतो तसा Emotional Quotient(EQ) आणि  Social Quotient (SQ) सुद्धा विकसित व्हायला हवा. हे तीन जर हातात-हात घालून काम करायला लागले तरच आपल्या समाजाचं भलं होईल. पुढील काळात या विषयांवर बोलायला आणि इतरांना उद्युक्त करायला आवडेल.

प्रत्यक्ष आपण फक्त १६ वर्षांपर्यंतच शाळेत असतो आणि त्यानंतर आपलं खरं आयुष्य सुरू होतं. सामान्यतः प्रबोधिनीबद्दल दोन-तीन आक्षेप कायम घेतले जातात. पहिला म्हणजे प्रबोधिनीतली लोकं शिष्ठ असतात, दुसरा म्हणजे एककल्ली असतात आणि तिसरा म्हणजे स्वतःला शहाणी समजणारी असतात. मला वाटतं की विद्या विनयेन शोभते. ती विनम्रता आपण जोपासायला पाहिजे. शाळेच्या प्रवेश प्रक्रियेत आपल्या मनात आपण हुशार आहोत हे बीज पेरलं जातं. आपण खूप वेळ शाळेत असतो आणि त्यामुळे त्या zone मध्ये असतो. त्यामुळे शाळेच्या वातावरणातून बाहेर आल्यावर अचानक आपण एकटे पडतो, आपल्याला जग वेगळं दिसायला लागतं. तेव्हा खरंतर शाळेतील त्या सगळ्या शिकवणुकीचा, संस्कारांचा उपयोग करणं हे महत्त्वाचे आहे. ती सहा वर्षं ही आपली mobile charging सारखी असतात. आपण भरपूर ऊर्जा घेतो शाळेकडून, charge होतो मोबाईल वापरण्याची खरी वर्षं ही शाळेतून बाहेर पडल्यावर सुरू होतात.. मी माझ्या वागण्यातून शाळेवरील आक्षेप कसा बदलेन याचा विचार आपण करायला हवा.

ज्या बौद्धिक आक्रमणामुळे भारताचा खरा इतिहास, संस्कृती, धर्म आपल्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही, ते बदलण्यासाठी प्रबोधिनीने एक google सारखं search engine तयार करावं. ज्यामार्फत आपल्या देशाची खरी संस्कृती, धर्म, खरा इतिहास आणि सकारात्मक वर्तमान हे जनसामान्यांसमोर येऊ शकेल.

गुरु असं म्हणलं की वर्षानुवर्ष शाखेत गेल्यामुळे भगवा ध्वजच कायम डोळ्यासमोर येतो. न बोलता सरळ ताठ मानेने उभा आहे आणि खूप प्रेरणा देणारा आहे. आता काम करताना असं जाणवतं, की डॉ. हेडगेवार यांची केवढी दूरदृष्टी होती की त्यांनी कुठल्याही व्यक्तीला गुरु म्हणून मानलं नाही, तर भगव्या ध्वजाला गुरु मानलं. गुरु म्हणून एखादी व्यक्ती परिपूर्ण असू शकत नाही. व्यक्तींच्या काही मर्यादा असतात, आयुष्याच्या वेळेचं बंधन असतं. त्यामुळे भगवा ध्वज हा गुरु असणं नक्कीच जास्त योग्य वाटतं. नंतरचे गुरु आई-बाबा आहेत. त्यांचं योगदान मोजताच येणार नाही. समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका ताई आपटे यांचा सहवास खूप कमी लाभला पण नंतर वाचनातून आणि ऐकीवातून आलेलं त्यांचं व्यक्तिमत्त्व हे इतकं मोठं होतं की ज्या दिवशी त्या गेल्या, त्याच्या दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात हिंदुत्वाचं मातृहृदय हरपलं अशा शीर्षकाचा  लेख आलेला होता. वंदनीय ताई माझ्यासाठी खूप मोठ्या  मार्गदर्शक आहेत. त्याशिवाय स्वामी विवेकानंद आणि भगिनी निवेदिता यांच्या चरित्राचा माझ्यावर खूप प्रभाव आहे. याशिवाय मला प्रत्येक कार्यकर्त्यांच्या कडून काहीतरी शिकायला मिळतच असतं. गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी पुण्यात असले तर  हमखास गिरीशरावांना भेटायला जाते. माझ्या मनात त्यांचं स्थानही नक्कीच मोठं आहे.

माझं आजचं प्रबोधिनीशी जे नातं आहे ते गुरु-शिष्याचं आहे असं मला वाटतं. खूप शिकायला मिळालं. इतक्या देशात प्रवास करताना, ज्या समस्या आल्या त्यांना खंबीरपणे भिडण्याचं धैर्य प्रबोधिनीने दिलं. आज बौद्धिक स्पंदन देणारं काम प्रबोधिनी करते आहे याविषयी मनात श्रद्धा आहे.

तरुणांकडे तीन प्रकारच्या शक्ती असतात. जिद्द, क्रियाशक्ती आणि कल्पनाशक्ती. या सगळ्याचा उपयोग समाजासाठी केला पाहिजे. social media चा वापर करून सकारात्मक गोष्टी पसरवल्या पाहिजेत. आपण सगळ्यांनी संपूर्ण भारत दर्शन करायला हवे  तरच आपण भारत समजून घेऊ शकू. आपल्या भारताचा पराक्रमाचा आणि शौर्याचा इतिहास आपण वाचायला हवा. त्यातून प्रेरणा मिळते. प्रबोधक म्हणून सांगायचं झालं तर one week for nation in vacation असं आपण ठरवायला हवं.



## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट – गुंजन सक्सेना– The Kargil girl.

२. आवडतं पुस्तक – माणूस नावाचं काम– यशवंतराव केळकर

३. छंद – अभिलेखागार/ documentation

४. आवडता सामाजिक कार्यकर्ता– निवेदितताई भिडे –विवेकानंद केंद्र. खूप अभ्यासू आणि सहज व्यक्तिमत्त्व

५. पहिली प्रतिक्रिया–

- राष्ट्र सेविका समिती – विशाल मातृत्व
- संस्कृत भाषा – चिर पुरातन – नित्यनूतन – ज्ञान संपदेची भाषा.
- भारत देश– विश्वगुरु
- आप्पा पेंडसे – शैक्षणिक क्षेत्रातलं समर्पित असं नेतृत्व
- ज्ञान प्रबोधिनी– प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया, समर्थ मायभूमीला जगी करावया.

**भाग्यश्री साठये**
**9422321546**
**chanda.sathaye@gmail.com**

**मुलाखत – चिन्मयी खरे, ईशा कान्हेरे** **शब्दांकन – चिन्मयी खरे**

**संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org